स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 21–11–2014** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 5. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 6. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 7. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 8. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 9. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 10. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 2. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 3. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 4. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 5. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |
| 6. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 267 :– स्थायी समितीने ठराव क्र. 71 दिनांक 15.06.2013 अन्वये सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनायझेशन या संस्थेस काम वाटप करून मंजूर केलेल्या प्रजापतीनगर चौक रिंग रोड येथे 6 सिट्चे सुलभ शोचालय बांधण्याचा रू. 11,38,212/– च्या प्राकलनाच्या अनुषंगाने सदर संस्थेने या कामाकरीता सादर केलेल्या 5 सिट्सच्या शौचालयाच्या बांधकामाचा रू. 20,01,667/– चा सुधारित प्रस्ताव मंजूर करणे तसेच सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनाइझेशन या संस्थेने सुलभ शौचालयाचे बांधकाम करणे व 30 वर्षांकरीता देखभाल व संचालन करणे यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्राकलनीय राशी पेक्षा निविदाकाराचे दर अधिक असल्यामुळे प्रस्तावित निविदा दर कमी करण्याची कार्यवाही विभागाने पूर्ण

करुन परत स्थायी समिती समोर विषय सादर करावा, या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 268</u> :— स्थायी समितीने ठराव क्र. 71 दिनांक 15.06.2013 अन्वये सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनायझेशन या संस्थेस काम वाटप करून मंजूर केलेल्या सिरसपेठ, ग्रेटनाग रोड येथे 5 सिट्चे सुलभ शोचालय बांधण्याचा रू. 9,48,510/— च्या प्राकलनाच्या अनुषंगाने सदर संस्थेने या कामाकरीता सादर केलेल्या 5 सिट्सच्या शौचालयाच्या बांधकामाचा रू. 20,01,667/— चा सुधारित प्रस्ताव मंजूर करणे तसेच सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनाझेशन या संस्थेने सुलभ शौचालयाचे बांधकाम करणे व 30 वर्षांकरीता देखभाल व संचालन करणे यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्राकलनीय राशी पेक्षा निविदाकाराचे दर अधिक असल्यामुळे प्रस्तावित निविदा दर कमी करण्याची कार्यवाही विभागाने पूर्ण करुन परत स्थायी समिती समोर विषय सादर करावा, या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 269</u>:— स्थायी समितीने ठराव क्र. 71 दिनांक 15.06.2013 अन्वये सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनायझेशन या संस्थेस काम वाटप करून मंजूर केलेल्या महाराजबाग येथे 5 सिट्चे सुलभ शोचालय बांधण्याचा रू. 9,48,510/— च्या प्राकलनाच्या अनुषंगाने सदर संस्थेने या कामाकरीता सादर केलेल्या 14 सिट्सच्या शौचालयाच्या बांधकामाचा रू. 38,95,898/— चा सुधारित प्रस्ताव मंजूर करणे तसेच सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनाझेशन या संस्थेने सुलभ शौचालयाचे बांधकाम करणे व 30 वर्षांकरीता देखभाल व संचालन करणे यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्राकलनीय राशी पेक्षा निविदाकाराचे दर अधिक असल्यामुळे प्रस्तावित निविदा दर कमी करण्याची कार्यवाही विभागाने पूर्ण करुन परत स्थायी समिती समोर विषय सादर करावा, या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 270</u> :— नागपूर महानगरपालिके तर्फे सन 2014—15 सत्रांत "नागपूर महोत्सव" कार्यक्रमाचे आयोजन "यंशवंत स्टेडियम" येथे करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाकरीता प्राकलन नुसार रू. 1,54,20,000/— खर्च अपेक्षित आहे. यापैकी रू. 95 लक्ष मुख्य कार्यक्रम ( Event Management Company) अग्रीम द्वारा, रू. 47 लक्ष निविदेद्वारे, (ध्वनी, स्टेज, लाईटींग, फ्रि पासेस, व्ही.आय.पी. पासेस, आसन व्यवस्था व इतर) रू. 1 लक्ष (सन्मान चिन्ह, शाल व श्रीफळ) आवेदनाद्वारा वृत्तपत्र व इतर जाहिरात व मिडीयाद्वारा रू. 9 लक्ष, प्रसिध्दी विभाग द्वारा व किरकोळ तथा आकस्मिक खर्च रू. 2 लक्ष अग्रीम द्वारा, फोटो खर्च रू. 20,000/— धनादेश द्वारे असा एकुण रु. 1,54,20,000/— खर्च नागपूर महोत्सव करिता प्रशासकीय तथा वित्तीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मुख्य कार्यक्रम रु. 95 लक्ष (कलाकारांचे निर्मिती व इतर खर्च) धनादेशा द्वारे व रु. 47 लक्ष ध्वनी, स्टेज व्यवस्था, विद्युत व्यवस्था, फ्री पासेस, व्ही.आय.पी. पासेस, पत्रिका मुद्रीत करणे, आसन व्यवस्था व इतर कार्य Event Managment मार्फत करण्यासाठी वरील दोन्ही बाबींची एकत्रित निविदा काढण्यास एकमताने मंजूरी तसेच इतर खर्च विभागाने प्रस्तावित केल्या प्रमाणे विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 271</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती

स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर